# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:07.03.2025** **वार : शुक्रवार**

---

**ठळक बातम्या,**

- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर
- बनावट कंपन्यांकडून होणारी फसवणूक टाळण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र गुप्तवार्ता विभाग स्थापन करणार
- पन्हाळगड लवकरच जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखला जाईल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
- 'नारी शक्तीसह विकसित भारत' या मध्यवर्ती संकल्पनेवर साजरा होणार यंदाचा जागतिक महिला दिन
- आणि
- मासेमारी बोटीला झालेल्या अपघातात पालघर जिल्ह्यातल्या चार खलाशांचा मृत्यू

,

**विधिमंडळ**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक 2025 काल विधानसभेत एकमताने मंजूर झालं. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. या सुधारणेमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या पडीक जमिनी शेतकऱ्यांना परत मिळणार आहेत. राज्यातील 4849 एकर पडीक जमीन शेतकऱ्यांना मिळणार आहे. याचा लाभ छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना होणार आहे. महाराष्ट्रात धान आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी सरकार सकारात्मक असून मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाईल, असं कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी काल विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. कंपन्यांकडून होणारी गुंतवणूकदारांची फसवणूक टाळण्यासाठी राज्यात आर्थिक गुप्तवार्ता विभाग सुरू करण्यात येईल, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी काल विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली. टोरेस कंपनीकडून झालेल्या गुंतवणूकदारांच्या फसवणुकीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काळे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची कोणतीही चुकीची भर्ती झालेली नाही, असं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी काल विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात स्पष्ट केलं. खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते देण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही भुसे यांनी दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते भैय्याजी जोशी यांनी मराठीच्या संदर्भात केलेल्या

वक्तव्याचा मुद्दा काल विधीमंडळाच्या दोन्ही गाजला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. यावर मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. विधानपरिषदेतही या मुद्द्यावरुन विरोधक आक्रमक झाले आणि त्यांनी सभात्याग केला. त्यावर महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे, त्याने मराठी शिकली पाहिजे आणि शिक्षणही मराठीत घेतलं पाहिजे, हीच राज्य सरकारची भूमिका आहे, असं मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. या मुद्द्यावरुण महाविकास आघाडीच्या आमदारांनी काल हुतात्मा स्मारकाला अभिवादन करुन आंदोलन केलं. जोशी यांच्याविरोधात राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. तर विरोधकांना या मुद्द्यावरुन राजकारण करायचं आहे. कुणीही मातृभाषेचा अवमान करु नये ही सरकारची भूमिका आहे”, असं मराठी भाषा मंत्री उदय सामंत विधान भवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने परदेशातलं पहिलं मराठी ग्रंथालय जपानमध्ये सुरू होत असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही जोशी यांच्या मराठीबाबतच्या विधानावर तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान आपल्या विधानाचा विपर्यास केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैयाजी जोशी यांनी म्हटलं आहे. मराठी ही महाराष्ट्राची आणि मुंबईची भाषा आहे यात दुमत नाही, आणि बाहेरुन आलेल्यांना ती समजायलाच हवी असं ते म्हणाले.

**शिवाजी महाराज**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांपैकी पन्हाळगड हा राज्यातला पहिला शिवकालीन पुनर्निर्मित किल्ला असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. जागतिक वारसास्थळ म्हणून जाहीर झालेला पहिला किल्ला अशी ओळखही पन्हाळगड लवकरच निर्माण करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा किल्ल्यावरील 13 डी थिएटरचे लोकार्पण आणि पन्हाळगडाचा रणसंग्राम या लघुपटाचं अनावरण काल फडणवीस यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**फडणवीस**

तंत्रज्ञानाच्या योग्य वापराने प्रशासनात पारदर्शकता येत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. काल ठाण्यात स्पेस टेक फॉर गुड गव्हर्नन्स या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते. येत्या 3 महिन्यात राज्य सरकार अंतराळ धोरण तयार करणार असल्याचं फडणवीस यांनी यावेळी जाहीर केलं.

**महिला दिन**

यंदाचा महिला दिन 'नारी शक्तीसह विकसित भारत' या संकल्पनेनुसार साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय महिला आणि बालकल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी काल केली. या निमित्ताने नवी दिल्ली इथं विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत एका परिसंवादाचं आयोजनही करण्यात

आल्याचं त्यांनी सांगितलं. सरकार विविध धोरणं आणि योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानतेसाठी काम करत असल्याचंही त्या म्हणाल्या.

**बीजमाता**

अंतराळ तंत्रज्ञान असो की क्रीडा क्षेत्र आणि विविध कला असोत की कृषी क्षेत्र ---महिलांनी सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. ममता बाई भांगरे त्यातल्याच एक. अहिल्यानगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातल्या देवगावच्या ममता बाईंनी देशी बी बियाणाच संवर्धन केलं असून सेंद्रिय शेतीच्या प्रसारासाठी त्या ठिकठिकाणी मार्गदर्शनही करत असतात. केंद्र सरकार तसंच विविध संस्थांनी त्यांच्या या कार्याची दाखल घेत त्यांना पुरस्कारानं सन्मानितही केलं आहे. आपल्या या कामाबाबत आकाशवणीशी बोलताना ममताबाई भांगरे म्हणाल्या

**तर मी पारंपारिक शेती करते माझ्याकडे सगळे गावरान वाण आहेत ते गावरान वाण च जतन करून आज बीज बँका तयार झालेल्या आहेत, त्या बीज बँकेत मी ते सगळे वाण जतन करून ठेवते सगळ्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचवते , सेंद्रिय शेती करते मी सेंद्रिय शेतीत मी गांढूळ खत गोळीचा शोध लावला . आज तीच गोळी आम्ही सार्वजन वापरतो. आता बियाणांचे संवर्धन करून परसबागा आम्ही उभ्या केल्या आहेत. तर प्रत्येक घरी महिला सगळ्या परसबागेत ला ताजा भाजीपाला खाऊन त्याचा बियाणे पण तयार करतात.**

**महिला रोजगार मेळावा**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगानं राज्यात अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय संचार ब्युरोनं अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर नगरपरिषदेत कालपासून  तीन दिवसांचं बहुमाध्यम प्रदर्शन आयोजित केलं आहे. या निमित्तानं विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहेत.

**धनखड**

देशातल्या नागरिकांच्या स्थलांतरावर आणि धर्मांतरावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी टीका केली आहे. या मुद्द्यांकडे लक्ष दिलं नाही तर आपलं अस्तित्व धोक्यात येईल असा इशारा त्यांनी दिली. मुंबईत मुरली देवरा स्मृती संवाद कार्यक्रमात ते काल बोलत होते. लोकशाहीमध्ये संवाद आवश्यक असल्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. राहुल गांधी-मुंबई लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी काल मुंबईच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी धारावीला भेट देत तिथले लघुउद्योजक आणि राहिवाशांशी संवाद साधला.

**कोकण गंधर्व**

कोकणगंधर्व अशी ओळख असलेले रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणचे ज्येष्ठ गायक राजाभाऊ शेंबेकर यांना रसिक चाहत्यांनी 'स्वराधिराज' ही पदवी बहाल केली आहे. रत्नागिरीत तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांच्या हस्ते नुकताच राजाभाऊंचा गौरव करण्यात आला. रूढार्थाने संगीताचं कुठलंही शिक्षण घेतलेलं नसताना राजाभाऊंना हा लोकाश्रय मिळाला, त्यांच्या कार्याविषयीचा हा वृत्तांत ---

**चिपळूणचे राजाभाऊ शेंबेकर म्हणजे रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवलेले गायक. चरितार्थासाठी त्यांनी एसटीत चालक म्हणून नोकरी केली. रात्रीच्या जागरणीसह करावं लागणारं हे ताणाचं काम करतानाच त्यांनी स्वतःतल्या कलाकाराला जिद्दीने पैलू पाडले. एसटीत तीस वर्षं विनाअपघात सेवा बजावतानाच पंडित जितेंद्र अभिषेकी, पंडित राम मराठे, पंडित छोटा गंधर्व यांच्यासारख्या दिग्गजांच्या गायकीचं त्यांनी एकलव्याच्या निष्ठेने अध्ययन केलं. ऑर्गन आणि तबलावादनातही ते पारंगत झाले. प्रसिद्ध कीर्तनकार हरिभक्तिपरायण दत्तदासबुवा घाग, कराडकरबुवा यांना त्यांनी कीर्तनात साथही केली. अनेक शिष्यही त्यांच्याकडे घडले. त्यांच्या या योगदानाप्रीत्यर्थ चाहत्यांनी एकत्र येऊन त्यांचा सन्मान करण्याचं ठरवलं. रसिक श्रोत्यांच्या गर्दीने तुडुंब भरलेलं सभागृह राजाभाऊंना मिळालेल्या लोकाश्रयाची साक्ष देत होतं.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**खलाशी मृत्यू**
समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेलेल्या गुजरातमधल्या नामे निराली या बोटीला अपघात झाला; यात पालघर जिल्ह्यातल्या झाई इथल्या चार मच्छीमार खलाशांचा बुडून मृत्यू झाला. नामे निराली ही बोट 18 फेब्रुवारीला दहा खलाशांसह खोल समुद्रात मासेमारीसाठी गेली होती. ती परतत असताना या बोटीला भीषण अपघात झाला. दोन खलाशांना जखमी अवस्थेत बाहेर काढण्यात आलं.

**निधन**
बालरंगभूमी चळवळीतील ज्येष्ठ रंगकर्मी धनंजय जोशी यांचं काल सांगलीत निधन झालं. ते 52 वर्षांचे होते. त्यांचे एकपात्री प्रयोग, बालनाट्य, संस्कृत तसंच विनोदी नाटकं विशेष गाजली.

**हवामान**
मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली असून येत्या 24 तासात कोकणात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**